दिनेश
बिल्डींग मटेरियल सप्लायर्स
खडी, क्रेशेन, वन फोर, डबर, वॉशटेन, मुरूम, वीट, सिमेंट ब्लॉक
(सुट्ट सिमेंट मिळेल...)
मो. नं. 9271713368, 9860330587

दैनिक
# आकर्षण
संपादक : विजय सांगळे सहसंपादक : तुकाराम कामठे

या गुढी पाडव्याला आपल्या घराला द्या नवीन आणि आधुनिक साज!
इंटेरिअर डिझायनर श्रेया निलाखे
घर, फ्लॅट व ऑफिससाठी आकर्षक आणि आधुनिक इंटेरिअर डिझाईन.
- आधुनिक व मिनिमल डिझाईन
- स्मार्ट स्पेस प्लॅनिंग
- बजेटमध्ये सुंदर इंटेरिअर सोल्युशन्स



संपर्क: 75-59-26-16-75

वर्ष ५ । अंक १८४ । गुरुवार ९ एप्रिल २०२६ । पाने ४ । मूल्य ₹ २ https://epaper.dainkaakarshan.com E-mail- dainikaakarshan@gmail.com RNI NO. MAHMAR/2021/84322

# चिचोंडी पाटीलच्या शासकीय जागेवरील बेकायदेशीर सॉ मिलच्या चौकशीचे आदेश

## बेकायदेशीर अतिक्रमण, विनापरवाना लाकूड कापणी व साठा, तसेच पर्यावरणीय व ध्वनी प्रदूषणाची तक्रार

**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**अहिल्यानगर–** नगर तालुक्यातील चिचोंडी पाटील परिसरातील शासकीय जागेवर झालेल्या बेकायदेशीर अतिक्रमण, विनापरवाना लाकूड कापणी व साठा, तसेच पर्यावरणीय व ध्वनी प्रदूषणाच्या गंभीर तक्रारीवर चौकशी करून कार्यवाही करण्याचे आदेश उपविभागीय अधिकारी यांनी संबंधित विभागाला काढले आहेत.

सदर प्रकरणी ग्रामस्थांनी तक्रार करुन कारवाईबाबत पाठपुरावा केला होता. आपले सरकार पोर्टलवर दाखल झालेल्या तक्रारीच्या अनुषंगाने संबंधित प्रकरणाची दखल घेत विविध विभागांना तात्काळ चौकशी व कारवाई करण्याच्या सूचना देण्यात आल्या आहेत. या प्रकरणात महसूल विभागासह पोलीस प्रशासन, ग्रामविकास विभाग व महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ यांना संयुक्तपणे तपास करण्याचे निर्देश देण्यात आले आहेत.



पोलीस विभागाला कायदा व सुव्यवस्था राखण्याबरोबरच या प्रकरणातील आर्थिक गैरप्रकारांची चौकशी करण्याची जबाबदारी देण्यात आली असून, ग्रामविकास विभागाला स्थानिक पातळीवरील परिस्थितीचा आढावा घेण्याचे निर्देश आहेत. प्रदूषण नियंत्रण मंडळालाही पर्यावरणीय नियमांचे उल्लंघन तपासून आवश्यक ती कारवाई करण्यास सांगण्यात आले आहे.

प्रशासनाकडून संबंधित विभागांना तात्काळ अहवाल सादर करण्याचे आदेश देण्यात आले असून, या प्रकरणात दोषींवर कठोर कारवाई करण्याची मागणी तक्रारदार ग्रामस्थांनी केली आहे. तसेच भविष्यात अशा प्रकारचे प्रकार होऊ नयेत यासाठी कायमस्वरूपी उपाययोजना करण्यात याव्यात, अशी अपेक्षा व्यक्त केली आहे.

### अतिक्रमित जागेवरील गाळे दिले भाडेतत्त्वावर

तक्रारीनुसार, संबंधित ठिकाणी शासकीय जागेवर बेकायदेशीर अतिक्रमण करण्यात आले असून विनापरवाना लाकूड कापणी व साठा केला जात आहे. यामुळे पर्यावरणीय समतोल बिघडण्याबरोबरच ध्वनी प्रदूषणाचेही गंभीर प्रश्न निर्माण झाले आहेत. तसेच कामगारांच्या सुरक्षिततेचे नियम पाळले जात नसल्याची बाबही समोर आली आहे. विशेष म्हणजे, या अतिक्रमित जागेवर उभारण्यात आलेले गाळे भाडेतत्त्वावर देण्यात आल्याचे समोर आले असून, शासकीय मालमत्तेचा व्यावसायिक वापर होत असल्याची बाब अधिक गंभीर मानली जात आहे.महसूल विभागाकडून या प्रकरणाची सखोल चौकशी करून अतिक्रमण हटविणे, संबंधितांची नोंद घेणे आणि गाळ्यांच्या भाडेव्यवहारांची पडताळणी करून कायद्यानुसार पुढील कारवाई करणे अपेक्षित आहे.

# बारामतीत काँग्रेसची अखेरच्या क्षणी माघार

## अभिजीत बिचुकले, करुणा मुंडेंसह २३ उमेदवार रिंगणात

**पुणे । वृत्तसंस्था –** राज्याचे लक्ष लागलेल्या बारामती विधानसभा पोटनिवडणुकीत काँग्रेसने अखेरच्या क्षणी माघार घेतली आहे. अर्ज माघारीच्या शेवटच्या दिवशी या ठिकाणी मोठ्या राजकीय घडामोडी पाहायला मिळाल्या. काँग्रेस उमेदवार आकाश मोरे यांनी आपला अर्ज माघारी घेतला. काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांनी याबाबतची घोषणा केली. या ठिकाणी अर्ज दाखल केलेल्या ५३ पैकी एकूण ३० उमेदवारांनी आपले अर्ज मागे घेतले आहेत. मात्र, बिग बॉस फेम अभिजीत बिचुकले आणि करुणा मुंडे- शर्मा यांचे अर्ज कायम आहेत. बुधवारी सहाजणांनी व आज २४ जणांनी असे एकूण ३० उमेदवारांनी अर्ज माघारी घेतले. त्यामुळे बारामती पोटनिवडणुकीत एकूण २३ जण निवडणुकीच्या रिंगणात आहेत.

# राहुरीत चार अपक्षांसह सात उमेदवार रिंगणात

**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**अहिल्यानगर–** राहुरी विधानसभा पोटनिवडणुकीत आज अर्ज माघारीच्या शेवटच्या दिवशी ७ उमेदवार रिंगणात राहिले असून, त्यात चार अपक्षांचा समावेश आहे.

आमदार शिवाजीराव कर्डीले यांच्या निधनानंतर रिक्त झालेल्या जागेवर होत असलेल्या विधानसभा पोटनिवडणुकीत भाजप महायुतीने त्यांचे पुत्र अक्षय कर्डीले यांना उमेदवारी दिली आहे, तर राष्ट्रवादी शरद पवार पक्षाचे प्राजक्त तनपुरे यांनी माघार घेतल्यानंतर राष्ट्रवादीने गोविंद मोकाटे यांना तिकीट दिले आहे.

भाजपचे अक्षय कर्डिले व राष्ट्रवादीचे (शप) गोविंद मोकाटे यांच्यात प्रमुख लढत होत असली तरी या ठिकाणी वंचित-बहुजन आघाडीकडून संतोष चोळके उमेदवार आहेत. तर, चार अपक्ष उमेदवारांमध्ये शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे माजी जिल्हाप्रमुख रावसाहेब खेवरे यांचाही समावेश आहे.

### रिंगणातील सात उमेदवार

**अक्षय कर्डीले - भाजप महायुती, गोविंद मोकाटे - राष्ट्रवादी (शप), संतोष चोळके - वंचित-बहुजन आघाडी, अथर्व म्हसे - अपक्ष, रावसाहेब खेवरे - अपक्ष सूर्यभान लांबे - अपक्ष, महेश हापसे - अपक्ष**

# मनपा पदाधिकारी, अधिकारी व कर्मचाऱ्यांसाठी क्रीडा व सांस्कृतिक महोत्सव

## १० एप्रिलला माऊली सभागृहात रंगणार सांस्कृतिक कार्यक्रम; विविध क्रीडा स्पर्धांचा उत्साह । क्रिकेटपासून बुद्धिबळापर्यंत स्पर्धांचा मेळावा; २४ एप्रिलला पारितोषिक वितरण

**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**अहिल्यानगर–** महानगरपालिकेच्या वतीने पदाधिकारी, अधिकारी व कर्मचाऱ्यांसाठी क्रीडा स्पर्धा व सांस्कृतिक कार्यक्रमाचे भव्य आयोजन करण्यात आले आहे. या उपक्रमामुळे मनपा कर्मचारी व अधिकाऱ्यांमध्ये एकोपा, स्नेहभाव व उत्साह वाढण्यास मदत होणार असून, विविध स्पर्धांमुळे कौशल्याला वाव मिळणार आहे.

या महोत्सवाची सुरुवात १० एप्रिल रोजी माऊली सभागृह येथे होणाऱ्या सांस्कृतिक कार्यक्रमाने होणार असून, हा कार्यक्रम मोठ्या उत्साहात पार पडणार आहे. यामध्ये कर्मचाऱ्यांच्या कलागुणांना व्यासपीठ मिळणार असून, विविध सांस्कृतिक सादरीकरणे सादर केली जाणार आहेत.

यानंतर ११ व १२ एप्रिल रोजी अहमदनगर महाविद्यालयाच्या मैदानावर क्रिकेट स्पर्धांचे आयोजन करण्यात आले आहे. या स्पर्धांमध्ये विविध विभागांतील संघ सहभागी होऊन क्रीडास्पर्धेचा आनंद लुटणार आहेत. तसेच १८ व १९ एप्रिल रोजी वाडिया पार्क मैदानावर मैदानी व इतर क्रीडा स्पर्धा रंगणार आहेत. यामध्ये जलद चालणे, धावणे, गोळाफेक यांसारख्या मैदानी स्पर्धांसह कॅरम, बुद्धिबळ व बॅडमिंटन अशा विविध स्पर्धांचा समावेश आहे. या स्पर्धांमुळे कर्मचाऱ्यांच्या शारीरिक तंदुरुस्तीबरोबरच मानसिक चपळतेलाही चालना मिळणार आहे.



या सर्व स्पर्धांचा समारोप २४ एप्रिल रोजी राजमाता जिजाऊ महापालिका सभागृहात पारितोषिक वितरण समारंभाने होणार असून, विजेत्यांना गौरविण्यात येणार आहे.

मनपा क्रीडा अधिकारी फिलिप्स यांनी या संदर्भात माहिती देताना सांगितले की, या क्रीडा व सांस्कृतिक उपक्रमांमुळे कर्मचारी व अधिकाऱ्यांमध्ये सकारात्मक वातावरण निर्माण होऊन कार्यक्षमता वाढण्यास मदत होईल. सर्वांनी मोठ्या संख्येने सहभागी होऊन या उपक्रमाला यशस्वी करावे, असे आवाहनही त्यांनी केले.

# घोडेगाव येथील रेकॉर्डवरील गुन्हेगार दोन वर्षांसाठी तडीपार

**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**अहिल्यानगर–** सोनई पोलीस ठाणे हद्दीतील घोडेगाव येथील रेकॉर्डवरील गुन्हेगार शाहरुख उर्फ चाट्या जावेद शेख (वय २७, रा. घोडेगाव ता. नेवासा) यास दोन वर्षांकरिता जिल्ह्यातून तडीपार करण्यात आले आहे.

या गुन्हेगारावर सोनई व जिल्ह्यातील इतर पोलीस ठाण्यांमध्ये मारामारी, गंभीर दुखापत, खंडणी, विनयभंग, अवैध हत्यार बाळगणे, दरोडा, दरोड्याची तयारी, जमाबंदी आदेशाचे उल्लंघन अशा विविध कलमांन्वये १२ गुन्हे दाखल आहेत. त्याच्यावर वेळोवेळी प्रतिबंधक कारवाई करून देखील त्याच्या वर्तनात कोणतीही सुधारणा होत नव्हती. त्यामुळे सोनई पोलिसांच्या वतीने महाराष्ट्र पोलीस अधिनियम कलम ५६ अन्वये उपविभागीय दंडाधिकारी अहिल्यानगर यांच्याकडे तडीपारीचा प्रस्ताव सादर करण्यात आला होता. त्याला नुकतीच मंजुरी मिळून आदेशानुसार शाहरुख उर्फ चाट्या जावेद शेख यास गंगापूर (जि. संभाजीनगर) येथील नातेवाईकांकडे आज दिनांक ९ रोजी सोडण्यात आले आहे.




# घर रिकामे पाहून चोरट्यांनी डाव साधला; आडूळ येथे मध्यरात्री धाडसी घरफोडी

## रविंद्र वायकोस यांच्या घरी चोरी; कुटुंब लग्नासाठी बाहेरगावी, चोरटे सीसीटीव्हीत कैद

**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**पैठण–** तालुक्यातील आडूळ येथे मध्यरात्रीच्या सुमारास अज्ञात चोरट्यांनी धाडसी घरफोडी करत चोरी केल्याची घटना उघडकीस आली आहे. ही चोरी रविंद्र वायकोस यांच्या घरी झाली असून, घरातील सर्व सदस्य लग्न कार्यक्रमासाठी बाहेरगावी गेल्याची संधी साधून चोरट्यांनी हा डाव साधला.

मिळालेल्या माहितीनुसार, वायकोस कुटुंब घर बंद करून बाहेरगावी गेले होते. याच काळात चोरट्यांनी घराचा दरवाजा उचकटून आत प्रवेश केला व घरातील रोकड, दागिने आणि इतर मौल्यवान वस्तूंवर हात साफ केला. दरम्यान, ही संपूर्ण घटना घरात लावण्यात आलेल्या सीसीटीव्ही कॅमेऱ्यात कैद झाली असून, चोरट्यांचे चेहरे काही प्रमाणात स्पष्ट दिसत असल्याची माहिती समोर येत आहे.



घटनेची माहिती मिळताच पाचोड पोलिसांसह स्थानिक गुन्हे शाखेचे पथक घटनास्थळी दाखल झाले. पोलिसांनी पंचनामा करून तपास सुरू केला असून, सीसीटीव्ही फुटेजच्या आधारे चोरट्यांचा शोध वेगाने सुरू आहे.
या घटनेमुळे परिसरात भीतीचे वातावरण निर्माण झाले असून, नागरिकांनी घर सोडताना योग्य सुरक्षा उपाययोजना करण्याचे आवाहन पोलिसांनी केले आहे.

### आमदार काशिनाथ दाते सरांचा दमदार पुढाकार

# देवीभोयरे फाटा, सुपा, सारोळा, खडकी रस्ता कामातील सुधारणांना मंत्रालयातून हिरवा कंदील



**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**पारनेर–** पारनेर-नगर मतदारसंघातील रस्ते व वाहतूक समस्यांवर कायमस्वरूपी तोडगा काढण्यासाठी आमदार काशिनाथ दाते सरांनी घेतलेला पुढाकार निर्णायक ठरत असून, त्यांनी लेखी पत्राद्वारे केलेल्या मागणीनुसार मंत्रालय, मुंबई येथे आयोजित केलेल्या सार्वजनिक बांधकाम विभागाच्या उच्चस्तरीय बैठकीत महत्त्वपूर्ण निर्णय घेण्यात आले.

सार्वजनिक बांधकाम मंत्री ना. शिवेंद्रसिंहराजे भोसले यांच्या अध्यक्षतेखाली पार पडलेल्या या बैठकीत आमदार दाते सरांनी स्थानिक नागरिकांच्या दळणवळणाच्या दृष्टीने अत्यंत महत्वपूर्ण असलेल्या देवीभोयरे फाटा, सुपा, सारोळा, खडकी रस्ता कामातील सुधारणां-संदार्भातील मागण्या ठामपणे मांडत प्रशासनाला ठोस निर्णय घेण्यास भाग पाडले.

बैठकीत सुपा चौक ते चौक हा सबंधित प्रकल्पातून वगळला गेलेला भाग मे. चेतक एंटरप्राइजेस लि. यांच्या कार्यक्षेत्रात येत असल्याने त्या भागाचे रुंदीकरणसह मुख्य कामासोबतच पूर्ण करण्याच्या केलेल्या मागणीवर झालेल्या चर्चेत सबंधित रस्ता मे. चेतक एंटरप्राइजेस लि.ने पूर्ण करण्याची जबाबदारी स्वीकारली. त्याचबरोबर पारनेर शहरातील पानोली चौक ते कान्हुर चौक दरम्यानचा भागही सबंधित प्रकल्पात समाविष्ट नसल्याचे व त्या रस्त्याची सुधारणा करणे आवश्यक असल्याचे निदर्शनास आणून दिल्यावर मंत्री शिवेंद्रसिंहराजे भोसले यांनी सबंधित कामाचे अंदाजपत्रक तयार करण्याचे आदेशित करत सबंधित काम पूर्ण करून देण्याचे मान्य केले.

याचबरोबर देवीभोयरे फाटा, सुपा, सारोळा, खडकी या रस्त्यावरील मौजे सारोळा कासार, ता. नगर येथे सबंधित प्रकल्पाच्या उद्दिष्टपूर्तीसाठी आवश्यक ■ पान ४ वर

## दै. आकर्षण निवडक

### बोरुडे यांना कोल्हापूरचा महात्मा फुले राष्ट्रीय सन्मान पुरस्कार जाहीर



अहिल्यानगर - येथील सामाजिक कार्यकर्ते तथा नेत्रदूत जालिंदर बोरुडे यांना कोल्हापूर येथील सत्यशोधक प्रागतिक मंच निर्मिती विचार मंचच्या वतीने महात्मा फुले राष्ट्रीय सन्मान पुरस्कार-२०२६ जाहीर करण्यात आल्याची माहिती संस्थेचे अध्यक्ष आदित्य म्हमाने व सचिव अंतिमा कोल्हापूरकर यांनी दिली आहे. शनिवार दि. ११ एप्रिल, २०२६ रोजी सकाळी १०:३० वा. राजर्षी शाहू स्मारक भवन, दसरा चौक, कोल्हापूर येथे मान्यवरांच्या हस्ते बोरुडे यांना पुरस्काराने सन्मानित केले जाणार आहे. जालिंदर बोरुडे स्वखर्चाने फिनिक्स सोशल फाउंडेशनच्या माध्यमातून गेल्या ३४ वर्षापासून शिबिर घेऊन हजारो गोरगरीब नेत्रदोष असलेल्या रुग्णांना मोफत मोतिबिंदू शस्त्रक्रिया घडवून आणत आहे. या सेवेच्या माध्यमातून अनेकांना नवदृष्टी मिळाली आहे. तर नागरिकांना मरणोत्तर नेत्रदानासाठी प्रोत्साहित करुन अनेकांचे नेत्रदान घडवून आनले आहे. तसेच फाऊंडेशनच्या माध्यमातून अवयवदान जनजागृतीसह विविध सामाजिक उपक्रम सुरु आहे. त्यांच्या या सामाजिक कार्याची दखल घेऊन बोरुडे यांना पुरस्कार जाहीर करण्यात आला आहे. पुरस्कार जाहीर झाल्याबद्दल त्यांचे सर्वत्र अभिनंदन होत आहे.

### नागरदेवळेत शुक्रवारी मोफत नेत्र तपासणी व मोतीबिंदू शस्त्रक्रिया शिबिर




अहिल्यानगर- फिनिक्स सोशल फाऊंडेशनच्या वतीने महात्मा फुले व भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंतीनिमित्त शुक्रवारी, १० एप्रिल रोजी मोफत नेत्र तपासणी व मोतीबिंदू शस्त्रक्रिया शिबिराचे आयोजन करण्यात आले आहे. हे शिबिर नागरदेवळे येथील संत सावता महाराज मंदिर परिसरात पार पडणार आहे. या शिबिराचा जास्तीत जास्त नागरिकांनी लाभ घ्यावा, असे आवाहन फिनिक्स सोशल फाऊंडेशनचे संस्थापक अध्यक्ष जालिंदर बोरुडे यांनी केले आहे. या शिबिरामध्ये तज्ज्ञ नेत्ररोग डॉक्टरांकडून अद्ययावत यंत्रसामग्रीच्या सहाय्याने मोफत नेत्र तपासणी करण्यात येणार आहे. यासोबतच जेष्ठ नागरिकांसाठी रक्तदाब, मधुमेह तसेच इतर आवश्यक आरोग्य तपासण्या देखील मोफत करण्यात येणार आहेत. त्यामुळे ग्रामीण भागातील नागरिकांना एकाच ठिकाणी सर्वसमावेशक आरोग्य सेवा मिळणार आहे. नेत्र तपासणीनंतर ज्यांना शस्त्रक्रियेची आवश्यकता भासेल, अशा रुग्णांवर पुणे येथील के.के. आय बुधराणी हॉस्पिटलमध्ये मोफत शस्त्रक्रिया करण्यात येणार आहे. यामध्ये मोतीबिंदू, काचबिंदू तसेच लहान मुलांच्या तिरळेपणावरील शस्त्रक्रियांचा समावेश आहे. विशेष बाब म्हणजे, या शस्त्रक्रियेसाठी रुग्णांचे पुणे येथे येणे-जाणे, राहण्याची व जेवणाची संपूर्ण व्यवस्था मोफत करण्यात आली आहे. या शिबिरासाठी नाव नोंदणी करण्यासाठी किंवा अधिक माहितीसाठी जालिंदर बोरुडे (मो. ९८८१८१०३३३) या क्रमांकावर संपर्क साधावा, असे फिनिक्स सोशल फाऊंडेशनच्या वतीने सांगण्यात आले आहे.

# कालव्यांसाठी ७५० कोटींचा निधी मंजूर

**| बंद जलविद्युत प्रकल्प तातडीने सुरू करण्याचे निर्देश**
**| जलसंपदा मंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांची माहिती**



**दैनिक आकर्षण | प्रतिनिधी**

**पैठण–** जायकवाडी धरणाच्या डाव्या कालव्याच्या अस्तरीकरणासाठी (लाईनिंग) ७५० कोटी रुपयांचा निधी मंजूर करण्यात आला असून, कालव्यांऐवजी बंदिस्त पाइपद्वारे पाणीपुरवठा करण्याचा पर्यायही शासनाच्या विचाराधीन असल्याची माहिती जलसंपदा मंत्री राधाकृष्ण विखे-पाटील यांनी दिली.

पैठण येथील संतपीठ परिसरात कालवा सल्लागार समितीची बैठक पार पडली. या बैठकीस जिल्ह्याचे खासदार कल्याण पाटील काळे, पैठणचे आमदार विलास पाटील भुमरे, वैजापूरचे आमदार बोरनारे, जिल्हाधिकारी तसेच विविध पाणी वापर संस्थांचे प्रतिनिधी उपस्थित होते.

मंत्री विखे-पाटील यांनी सांगितले की, कालव्याचे सुमारे २०८ किलोमीटरचे काम टप्प्याटप्प्याने पूर्ण करण्यात येणार असून, संपूर्ण प्रकल्पासाठी जवळपास ३ हजार कोटी रुपयांचा खर्च अपेक्षित आहे. हा निधी सिंचन सुधारणा कार्यक्रमांतर्गत उपलब्ध करून देण्यात येणार आहे.

बैठकीत धरणावरील अनेक वर्षांपासून बंद असलेल्या जलविद्युत निर्मिती केंद्राचा मुद्दा उपस्थित झाला. या प्रकल्पामुळे शासनाचे नुकसान होत असल्याचे निर्दशनास आणून देण्यात आले. यावर संबंधित अधिकाऱ्यांना तातडीने प्रकल्प सुरू करण्याचे निर्देश देण्यात आले. दरम्यान, लोकप्रतिनिधींनी कालव्यांच्या दुरुस्ती तसेच पाणी वाटपातील अडचणींबाबत लक्ष वेधले. यावर जिल्हाधिकारी व प्रशासनाने लवकरच योग्य तोडगा काढण्याचे आश्वासन दिले.

# जीवनातील आनंदाचे गूज भागवत कथा सांगते - प.पू.श्रीराधाकृष्णजी महाराज

**दैनिक आकर्षण | प्रतिनिधी**

**अहिल्यानगर–** जीवनात यशस्वी होण्याचे आणि आनंद मिळवण्याचे गूज भागवत कथा सांगते, असे प्रतिपादन प.पू. श्रीराधाकृष्णजी महाराजांनी केले. येथील श्री.रामनिवास सतीशचंद्र इंदाणी आणि इंदाणी परिवारातर्फे नवीन टिळक रोडवरील नंदनवन लॉन्समध्ये आयोजित करण्यात आलेल्या श्रीमद् भागवत कथा ज्ञानयज्ञ सोहळ्याचे तृतीय पुष्प गुंफताना ते बोलत होते. व्यासपीठावर श्रीक्षेत्र देवगड येथील हभप भास्करगिरी महाराज विराजमान होते. श्री.महेश इंदानी यांच्या हस्ते भास्करगिरी महाराजांचा तर सौ.दिव्या इंदाणी यांच्या हस्ते महापौर सौ.ज्योतीताई गाडे यांचा सत्कार करण्यात आला.

श्रीराधाकृष्णजी महाराज पुढे म्हणाले, असफल झालेल्या विद्यार्थ्यांना सफल कसे व्हावे? याची प्रेरणा भागवत कथेमधून मिळते. विद्या धन प्राप्त करण्यापूर्वी परमात्म्याचे स्मरण आवश्यक असते. दिवसाची सुरुवात भगवंताचे स्मरण करून करावी. आपल्या भारतीय संस्कृतीत भगवंताच्या स्मरणास अनन्यसाधारण महत्त्व आहे. वेळ निश्चित करून दररोज भगवंताचे भजन करावे, जीवनातील अडीअडचणी कमी होत चालल्याचे अनुभवास येते. राजा परीक्षित आपल्या प्रपंचाचा आणि राज्य कारभाराचा भार भगवंताकडे सोपवून निरंतर कथा श्रवणाचा आनंद घेत होते. त्यामुळे ते



श्रवण भक्तीचे आचार्य आणि आदर्श झाले. राजा असून राज्याचे रक्षण करण्यासाठी त्यांना कधीही युद्ध करावे लागले नाही. कारण आईच्या गर्भात संकटात असलेल्या परीक्षितासाठी भगवान सुदर्शन घेऊन आले होते, हे सर्वांना माहीत होते. अंत:करण निर्मळ असले की, भगवंताचा प्रभाव दिसून येतो. चित्तात भजन उतरले की, चिंतामुक्त होण्याचा आनंद मिळतो.

सीमेवरील सैनिक भययुक्त नसतो तर भयमुक्त असतो. संसदेत बसलेल्यांना आपण पाठवलेले असते तर सीमेवर बसलेले समोर मृत्यू दिसत असूनही देशसेवेच्या सद् भावनेने स्वत:हून गेलेले असतात. आपल्या देशातील सैनिक महात्मा पेक्षा कमी नाही, असे त्यांनी म्हणताच टाळ्यांचा कडकडाट होत भारत मातेचा उत्स्फूर्त जयघोष झाला.

भजनाचे महत्त्व सांगताना ते म्हणाले, कोणताही निष्णात डॉक्टर स्वत:च्या खानदानीचा इलाज प्रभावीपणे करू शकत नाही. मात्र भक्त मागील दहा पिढ्यांचा आणि पुढील दहा पिढ्यांचा उद्धार करतो, हे सत्य आहे. त्यामुळेच आजही एकनाथ, नामदेव, तुकाराम, ज्ञानेश्वर, मिराबाई, जनाबाई, नरसी मेहता अशा संतांची नावे घेतली की, मन प्रसन्न होते. भक्तांशी संबंध जोडला की, मन शाश्वत आनंदाची अनुभूती घेत रहाते.

लहानांप्रती स्नेह आणि मोठ्यांबद्दल आदर ठेवावा, जीवन आनंददायी होते. व्यापाऱ्यांना इमानदारीने व्यापार करतानाही अडचणींचा सामना करावा लागतो.

मनात भरली पंढरी जाईन म्हणते माहेरी
पांडुरंगाच्या दरबारी बाई हासत-नाचत...
या गीतावर उपस्थित भाविकांनी चांगलाच ठेका धरला. विठ्ठल माझा माझा माझा... या पंक्तीने वातावरण विठ्ठलमय केले.भगवंताची आठवण आपल्याला भगवंताजवळ घेऊन जाते, हे उपस्थितांनी अनुभवले. गाय चर्वण करत अन्न पचवते तसे भगवंताच्या कथेचे नित्य स्मरण करत ती अंत:करणात रूजवली तर अंतीम क्षणी भगवंताचे आपोआप स्मरण होऊन भगवंत रूपात विलीन होण्याचा आनंद मिळेल, असे श्री.राधाकृष्ण महाराजांनी विविध उदाहरणे देऊन सांगितले.

हभप भास्करगिरी महाराजांनी भागवत कथा जीवनातील भिती घालवणारी आहे असे सांगितले. कथा श्रवण करण्यासाठी शहराच्या विविध उपनगरातील स्त्री-पुरूष भाविकांची अलोट गर्दी होऊ लागली आहे. दररोज गर्दीचा उच्चांक होऊ लागल्याचे दिसून येते आहे.

# २१ एप्रिलपासून बेमुदत संपावर समन्वय समिती ठाम; तात्काळ तोडगा काढण्याची मागणी

**दैनिक आकर्षण | प्रतिनिधी**

**अहिल्यानगर–** अहिल्यानगर जिल्हा राज्य सरकारी, निमसरकारी कर्मचारी, मुख्याध्यापक व शिक्षक संघटना समन्वय समितीच्या वतीने राज्यातील सरकारी कर्मचारी, शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी येत्या मंगळवार, दि. २१ एप्रिल २०२६ पासून बेमुदत संप आंदोलन छेडण्याचा निर्धार केला आहे. सुधारित राष्ट्रीय निवृत्तीवेतन योजना () तात्काळ लागू करावी तसेच विविध प्रलंबित मागण्यांवर ठोस निर्णय घ्यावा, या प्रमुख मागण्यांसाठी हा संप पुकारण्यात आला आहे. या पार्श्वभूमीवर तालुकानिहाय दौरे सुरु करण्यात आले असून, हा संप यशस्वी करण्याचे आवाहन समन्वय समितीचे निमंत्रक रावसाहेब निमसे व कर्मचारी संघटनेचे अध्यक्ष सुभाष तळेकर यांनी केले आहे.

समन्वय समितीच्या म्हणण्यानुसार, राज्य शासनाने पूर्वीच्या आंदोलनानंतर जुन्या पेन्शनसदृश आर्थिक व सामाजिक सुरक्षा देण्याचे धोरण तत्त्वतः मान्य केले होते. तसेच यासंदर्भात समिती स्थापन करून



शिफारशीही स्वीकारण्यात आल्या. दि. २० सप्टेंबर २०२४ रोजी सुधारित राष्ट्रीय निवृत्तीवेतन योजना लागू करण्याचा शासन निर्णय झाला असला तरी प्रत्यक्ष अंमलबजावणी अद्याप झालेली नाही. परिणामी, १ मार्च २०२४ पासून सेवानिवृत्त झालेल्या कर्मचाऱ्यांना पेन्शन मिळत नसल्याने मोठ्या आर्थिक अडचणींना सामोरे जावे लागत आहे.

राज्यात सध्या एनपीएस, आरएनपीएस व केंद्राची यूपीएस योजना या पर्यायांचा विचार सुरू आहे. मात्र, एनपीएस योजना कर्मचाऱ्यांसाठी अपुरी असल्याचे मत, केंद्रातील यूपीएस योजना अनेक कर्मचाऱ्यांनी नाकारल्याचा उल्लेख, आरएनपीएस योजना अधिक सुरक्षित व फायदेशीर असल्याचा दावा आहे. आरएनपीएस अंतर्गत कर्मचाऱ्यांचे १०% व शासनाचे १४% (पुढे वाढून सुमारे १८.५%) योगदान जमा होऊन निवृत्तीनंतर शेवटच्या वेतनाच्या ५०% पर्यंत पेन्शन मिळण्याची हमी दिली जाते. त्यामुळे ही योजना कर्मचाऱ्यांसाठी अधिक सुरक्षित मानली जात आहे.

समितीने सांगितले की, गेल्या १५ महिन्यांत सात वेळा आंदोलन करूनही शासनाने ठोस निर्णय घेतलेला नाही. मुख्यमंत्री स्तरावर नियमित चर्चा यंत्रणा निर्माण करण्याची मागणीही करण्यात आली आहे, जेणेकरून लहान-मोठे प्रश्न तात्काळ सोडवता येतील.

संपाच्या माध्यमातून परीक्षा व सेवांतर्गत प्रगती योजना अंमलबजावणी, नोव्हेंबर २००५ पूर्वीच्या अनुदानित शिक्षकांना जुनी पेन्शन, नगरपालिका व नगरपरिषदांच्या आकृतीबंधाचा प्रश्न, चतुर्थश्रेणी व वाहनचालक भरती प्रक्रिया सुरू करणे, लिपिक वर्गाच्या पदोन्नतीतील अडचणी दूर करणे, सर्व कर्मचाऱ्यांसाठी आरोग्य विमा योजना लागू करणे, निवृत्ती वय ६० वर्षे करण्याची मागणी, कंत्राटी कर्मचाऱ्यांच्या सेवांचे नियमितीकरण या प्रश्नाबाबत शासनाचे लक्ष वेधले जाणार आहेया संपाच्या पार्श्वभूमीवर समन्वय समितीचे तालुकानिहाय दौरे सुरू आहेत. कोपरगाव व राहाता येथे झालेल्या बैठकींना उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला असून पुढील दौऱ्यांचे वेळापत्रक जाहीर करण्यात आले आहे: ९ एप्रिल संगमनेर, अकोला, १० एप्रिल श्रीरामपूर, राहुरी, १३ एप्रिल नेवासा, शेवगाव, पाथर्डी, १५ एप्रिल जामखेड, कर्जत, १६ एप्रिल पारनेर, श्रीगोंदा, १७ एप्रिल अहिल्यानगर, २० एप्रिल शहरातील सर्व कार्यालये येथे दौरे करुन बैठका घेतल्या जाणार आहे.

समितीने स्पष्ट केले की, हे आंदोलन केवळ आंदोलनासाठी नसून कर्मचाऱ्यांच्या न्याय्य हक्कांसाठीचा लढा आहे. शासनाने तात्काळ सकारात्मक निर्णय घेतला नाही तर २१ एप्रिलपासूनचा संप तीव्र करण्याचा इशारा देण्यात आला आहे.

# भविष्य सांगण्याच्या बहाण्याने वृद्धांना ठकविणारे दोघे जेरबंद

**कोतवाली पोलिसांची कारवाई | दोन अंगठ्या हस्तगत**




**दैनिक आकर्षण | प्रतिनिधी**

**अहिल्यानगर–** भविष्य सांगण्याच्या बहाण्याने वृद्धांना ठकवून लूट करणाऱ्या दोघांना कोतवाली पोलिसांनी जेरबंद करुन चोरलेल्या दोन सोन्याच्या अंगठ्या हस्तगत केल्या आहेत.

फिर्यादी संतोष चंद्रसेन गायकवाड (वय ६८ वर्षे रा. समतानगर केडगाव) हे दि. २८ मार्च रोजी सकाळी सव्वाअकराच्या सुमारास केडगाव वेशीसमोरील आंबेडकर पुतळ्याजवळ बसलेले असताना दोन अनोळखी इसमांनी भविष्य सांगण्याच्या बहाण्याने फिर्यादीचा विश्वास संपादन करुन फिर्यादीच्या हातातील सोन्याची अंगठी काढण्यासा सांगितली व २० रुपयाचे नोटमध्ये गुंडाळून ती फिर्यादीच्या शर्टाच्या खिशामध्ये ठेवली आहे असे भासवून त्या दोन अनोळखी इसमांनी सोन्याची अंगठी लांबवली.

याप्रकरणी कोतवाली पोलीस ठाण्यात अज्ञात चोरट्यांवर गुन्हा दाखल आहे.

दुसऱ्या एका घटनेत फिर्यादी अरुण सहादु निंबाळकर (वय ७४ वर्षे रा. लेखानगर एकवीरा चांक सावेडी) हे दि. २८ मार्च रोजी सकाळी दहाच्या सुमारास स्वस्तिक बसस्थानक नगर येथे पाथर्डी बसची वाट पाहत असताना तेथे दोन अनोळखी इसमांनी तुमचे भविष्य सांगतो असे म्हणून फिर्यादीचा विश्वास संपादन करुन त्यांच्या हातातील सोन्याची अंगठी काढून २० रुपयाच्या नोटमध्ये गुंडाळून ती पिशवीमध्ये ठेवली आहे असे भासवून ती अंगठी लांबवली.

ही माहिती कोतवाली पोलिसांना कळविल्यानंतर पोलिसांनी तांत्रिक विश्लेषणाच्या आधारे त्या दोन भामट्यांची ओळख पटवली व त्यांना ताब्यात घेऊन चौकशी केली असता त्यांनी गुन्ह्याची कबुली दिली.

त्यांच्याकडून एक लाख वीस हजार रुपये किमतीच्या एकूण बारा ग्रॅम वजनाच्या दोन अंगठ्या हस्तगत करण्यात आल्या आहेत. पुढील तपास मपोकॉ रोहिणी दरंदले या करीत आहेत.

सदरची कारवाई पोलीस अधीक्षक सोमनाथ घार्गे, अपर पोलीस अधीक्षक वैभव कलुवमें, उपविभागीय पोलीस अधिकारी दिलीप टिपरसे यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस निरीक्षक संभाजी गायकवाड, पोसई प्रविण पाटील, रोहिणी दरंदले, राहुल शींदे, दौंड, दीपक रोहकले, सत्यम शिंदे, सुरज कदम, सचिन लोळगे, राम हंडाळ, दक्षिण मोबाईल सेलचे राहुल गुंडू यांच्या पथकाने केली.

## नागरिकांच्या समस्या सोडविण्यासाठी सदैव कटिबद्ध– अमोल गाडे

**दैनिक आकर्षण | प्रतिनिधी**

**अहिल्यानगर–** शहरी भागातील दररोज नवनवीन समस्यांना सामोरे जावे लागते.या भागातील नागरिकांच्या समस्या सोडविण्यासाठी महापौर यांच्यासह नगरसेवक कटिबद्ध असल्याचे महापौर ज्योती गाडे यांचे वतीने अमोल गाडे यांनी सांगितले.

शहरातील पाईप लाईन रस्त्यावरील आनंदबन कॉलनी मध्ये आयोजित छोटेखानी सत्कार कार्यक्रमात बोलत होते.यावेळी कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी अनिल मुरकुटे हे होते. यावेळी व्यासपीठावर नगरसेवक अजिंक्य बोरकर, करण कराळे, ऋग्वेद गंधे,उपस्थित होते.

यापुर्वी सर्व नगरसेवक यांनी पाइप लाईन रस्त्यावर सुरू असलेल्या गटार दुरुस्ती कामाची पाहणी केली.त्यांनी संबधित कंत्राटदाराला सूचना दिल्या.

यावेळी बोलताना महापौर पति अमोल गाडे यांनी सांगितले की, आमदार संग्राम भैय्या जगताप यांच्या मार्गदर्शनाखाली शहराचा विकास होत आहे. छोट्या कॉलनीत विकास कामे होत आहेत. नागरिकांना येत असलेल्या समस्या त्यांनी पुढे येऊन सांगाव्यात. तसेच सुचना करण्यात.

यावेळी बोलताना नगरसेवक अजिंक्य बोरकर सांगितले की, नागरिकांच्या समस्या सोडवण्यासाठी आम्ही २४ तास उपलब्ध आहोत. नागरिकांनी आपल्या अडचणी सोबत सुचना ही करण्याची विनंती केली.

## पैठणमध्ये 'आयुर्वेदिक नॅचरल थेरपी'ची सेवा

**दैनिक आकर्षण | प्रतिनिधी**

**पैठण–** शहरातील साई हॉस्पिटलच्या पाठीमागे, नवीन कावसान जिमिंग रोड परिसरात दत्तात्रय सुंदरराव पा. लोढे यांच्यामार्फत 'आयुर्वेदिक नॅचरल थेरपी' केंद्र सुरू असून, विविध प्रकारच्या जुनाट आजारांवर नैसर्गिक पद्धतीने उपचार करण्यात येत असल्याची माहिती समोर आली आहे.

या केंद्रात हाडांचे आजार, सांधे दुखी, गुडघे दुखी, मणक्यातील व कंबरमधील त्रास, नस आखडणे आदी समस्यांवर उपचार केले जातात. तसेच बॉडी मसाज, मूळव्याध यांसारख्या आजारांवरही सेवा उपलब्ध असल्याचे सांगण्यात आले आहे. आयुर्वेदिक व नैसर्गिक उपचार पद्धतींचा अवलंब करून रुग्णांना आराम मिळवून देण्याचा प्रयत्न केला जात असल्याचे केंद्राकडून सांगण्यात येते. परिसरातील नागरिकांकडून या सेवेला प्रतिसाद मिळत असल्याची माहितीही पुढे आली आहे. अधिक माहितीसाठी इच्छुकांनी संपर्क साधावा, असे आवाहन करण्यात आले आहे.

**आकर्षण** हे सायं. दैनिक मालक, मुद्रक, प्रकाशक विजय शामराव सांगळे यांनी विराज मुद्रणालय, प्लॉट क्र. ९२,भगवान बाबा चौक, निर्मलनगर, सावेडी, अहिल्यानगर (महानगरपालिका) अहिल्यानगर – ४१४००३ (महाराष्ट्र) येथे (मुद्रीत) छापुन आकर्षण ऑफिस– प्लॉट नं. ९२, भगवानबाबा चौक, निर्मलनगर, सावेडी, नगर–मनमाड रोड, अहिल्यानगर– ४१४००३ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. ※संपादक – विजय शामराव सांगळे, मुख्य कार्यालयाचा फोन नंबर – ७७७६८१२८११. ई–मेल : dainikaakarshan@gmail.com (* पीआरबी कायद्यानुसार जबाबदारी यांच्यावर राहील.) (वाद अहिल्यानगर न्यायालयीन कक्षेत)
The Evening Daily Aakarshan is printed by the owner, printer, publisher Vijay Shamrao Sangale at Viraj Mudranalay, plot no.92, Bhagvanbaba Chauk, Nirmalnagar, savedi, Nagar-Manmad road, Ahilyanagar, 414003 (Maharashtra) and Published at plot no.92, Bhagvanbaba Chauk, Nirmalnagar, savedi, Nagar-Manmad road, Ahilyanagar 41403 (Maharashtra). *Editor - Vijay Shamrao Sangale, Phone no. of main office - 7776812811. Email - dainikaakarshan@gmail.com (*The responsibility under the PRB Act will be on him.)

## दै. आकर्षण निवडक

### स्कायब्रिज गृहप्रकल्पातील रहिवाशांची धार्मिकता कौतुकास्पद: पूज्य प्रणवदर्शनाश्रीजी म.सा.



अहिल्यानगर - राष्ट्रसंत आचार्य आनंदऋषीजी महाराज यांच्या पदस्पर्शाने पावन झालेल्या अहिल्या नगरच्या भूमीत भक्ती भाव पदोपदी जाणवतो. आचार्यश्रींच्या समाधीस्थळाजवळ असलेल्या स्कायब्रिज गृह प्रकल्पातही सर्व रहिवासी अतिशय भाविक आणि गुरूदेवांची शिकवण आचरणात आणणारे आहेत. याठिकाणी आल्यावर एकोपा आणि सेवाभाव पहायला मिळतो. सर्व रहिवाशांची एकजूट, परस्पर सौहार्द आणि धार्मिकता यामुळे या परिसरात अतिशय सकारात्मक वातावरण निर्माण झाले आहे. सर्व सण उत्सव एकत्र साजरे करतांना साधू साध्वीजींची आत्मियतेने सेवा करण्यात सर्व जण अग्रेसर हे कौतुकास्पद आहे, असे आशीर्वाद प. पू. प्रणवदर्शनाश्रीजी म.सा. यांनी दिले. पूज्य प्रणवदर्शनाश्रीजी म.सा. व पूज्य ईश दर्शनाजी म. सा. यांनी नुकतीच बुरूडगाव रोडवरील स्कायब्रिज गृहप्रकल्प येथे भेट देऊन भाविकांना आशीर्वाद दिले. स्कायब्रिजच्या प्रांगणात सर्व रहिवाशांनी अतिशय उत्साहात साध्वीजींचे सहर्ष स्वागत करून आशीर्वाद घेतले. स्कायब्रिज गृहप्रकल्पातील सर्व रहिवाशांचा एक मोठा परिवारच तयार झाला आहे. प्रत्येक कुटुंबिय एकत्र येऊन विविध सण उत्सव, राष्ट्रीय सण एकत्रित साजरे करतात. साधूसंतांचे आगमन म्हणजे सर्वांसाठी दिवाळी सारखा आनंद असतो. सर्व जण अतिशय भक्तिमय वातावरणात साधूसाध्वीजींचे स्वागत करून सेवा करतात.

### बहिणींच्या हक्कासाठी 'जनलोक अदालत'चा पुढाकार

अहिल्यानगर - कुटुंबव्यवस्थेमध्ये वाढत चाललेल्या मालमत्ता व वारसा हक्काच्या वादांच्या पार्श्वभूमीवर, बहिणींना त्यांचा न्याय्य हक्क मिळवून देण्यासाठी आणि कुटुंबातील नातेसंबंध जपण्यासाठी पीपल्स हेल्पलाईनने ''जनलोक अदालत'' या अभिनव उपक्रमाची घोषणा केली आहे. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंतीदिनी, १४ एप्रिल रोजी या उपक्रमाची औपचारिक सुरुवात होणार असून, ही लोकाभिमुख न्यायप्रणाली समाजात सकारात्मक परिवर्तन घडवेल, असा विश्वास व्यक्त करण्यात आला आहे. आजच्या आधुनिक युगातही मालमत्ता वाटपावरून भाऊ-बहिणी, तसेच पालक-संतती यांच्यात वाद निर्माण होत आहेत. हे वाद केवळ कायदेशीर मर्यादेत राहात नाहीत, तर भावनिक आणि सामाजिक तणावाला कारणीभूत ठरतात. विशेषतः महिलांना त्यांच्या कायदेशीर हक्कांपासून वंचित राहावे लागते, ही अत्यंत चिंताजनक बाब आहे.भारतीय कायद्यानुसार हिंदू उत्तराधिकार (सुधारणा) कायदा, २००५ अंतर्गत मुलींना जन्मतःच समान वारसाचा हक्क देण्यात आला आहे. विवाहानंतरही हा हक्क अबाधित राहतो. त्यामुळे बहिणीचा हिस्सा हा कोणताही दान किंवा कृपा नसून तिचा कायदेशीर अधिकार आहे. मात्र, प्रत्यक्ष व्यवहारात अनेक ठिकाणी हा हक्क नाकारला जात असल्याचे दिसून येते. यामागे ''मुलगी परकी झाली'', ''लग्नात दिले आहे'' अशा कालबाह्य आणि अन्यायकारक समजुती कारणीभूत ठरत आहेत. याच पार्श्वभूमीवर ''जनलोक अदालत'' ही संकल्पना अत्यंत महत्त्वाची ठरत आहे. पारंपरिक न्यायालयीन प्रक्रियेत वेळ, पैसा आणि मानसिक तणाव मोठ्या प्रमाणावर असतो, तसेच निकालानंतर नातेसंबंध तुटण्याची शक्यता वाढते. याउलट, जनलोक अदालत ही संवाद, समन्वय आणि सामंजस्यावर आधारित प्रणाली आहे.
येथे संबंधित पक्ष एकत्र येऊन कायद्याच्या मार्गदर्शनाखाली परस्पर सहमतीने तोडगा काढतात. ही संकल्पना केवळ न्याय मिळवण्याचा पर्याय नसून सामाजिक आणि मानसिक परिवर्तनाची चळवळ म्हणून पुढे येत आहे. जागरूकता, तर्कसंगत विचार आणि समतेच्या मूल्यांवर आधारित ही प्रणाली कुटुंबातील विश्वास पुन्हा प्रस्थापित करण्यास मदत करेल, असे मत व्यक्त करण्यात आले आहे.

# रयतच्या शाळा विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी कार्यरत असलेले संस्कार केंद्र – मनोहर करांडे

**लक्ष्मीबाई भाऊराव पाटील प्राथमिक शाळेत विविध स्पर्धेचे बक्षीस वितरण उत्साहात | विद्यार्थ्यांच्या गुणवत्तेचा गौरव**



**दैनिक आकर्षण | प्रतिनिधी**

**अहिल्यानगर–** रयत शिक्षण संस्था संचलित कापड बाजार येथील लक्ष्मीबाई भाऊराव पाटील प्राथमिक शाळेत सांस्कृतिक, शैक्षणिक, कला व क्रीडा स्पर्धांमधील विजेत्या विद्यार्थ्यांचा गौरव सोहळा उत्साहात पार पडला. वर्षभर विविध उपक्रमांत उल्लेखनीय यश संपादन करणाऱ्या विद्यार्थ्यांना बक्षिसे देऊन सन्मानित करण्यात आले.

शाळेमध्ये वर्षभर विविध स्पर्धांचे आयोजन करण्यात आले होते. यामध्ये वक्तृत्व, निबंध लेखन, चित्रकला, कथाकथन, हस्ताक्षर स्पर्धा तसेच विविध क्रीडा प्रकार व शैक्षणिक स्पर्धा परीक्षांचा समावेश होता. या सर्व स्पर्धांमध्ये विद्यार्थ्यांनी मोठ्या उत्साहाने सहभाग घेत उत्कृष्ट कामगिरी नोंदवली. प्रथम, द्वितीय, तृतीय आणि उत्तेजनार्थ पारितोषिके मिळवलेल्या विद्यार्थ्यांचा या कार्यक्रमात सत्कार करण्यात आला. हा बक्षीस वितरण सोहळा रयत शिक्षण संस्थेचे लाईफ मेंबर सदस्य तथा माजी उपप्राचार्य मनोहर करांडे यांच्या अध्यक्षतेखाली पार पडला. यावेळी संस्थेचे जनरल बॉडी सदस्य ज्ञानदेव पांडुळे, माध्यमिक विद्यालयाच्या मुख्याध्यापिका छायाताई काकडे, प्राथमिक विद्यालयाच्या मुख्याध्यापिका लक्ष्मीताई आहेर यांच्यासह शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

मनोहर करांडे यांनी अध्यक्षीय भाषणात सांगितले की, ''लक्ष्मीबाई भाऊराव पाटील प्राथमिक शाळा ही केवळ शिक्षण देणारी संस्था नसून विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी कार्यरत असलेला एक संस्कार केंद्र आहे. आज या मंचावर उभे असलेले विद्यार्थी हे उद्याचे जबाबदार नागरिक आहेत. त्यांच्यातील कौशल्य ओळखून त्याला योग्य दिशा देणे हे शिक्षकांचे कर्तव्य आहे. रयत शिक्षण संस्थेची परंपरा ही 'शिका आणि समाज घडवा' या तत्वावर आधारित आहे. कर्मवीर भाऊराव पाटील यांच्या विचारांचा वारसा या शाळेत जपला जात आहे. पालकांनीही मुलांना प्रोत्साहन देऊन त्यांच्या गुणवत्तेला वाव द्यावा. शिक्षणाबरोबरच संस्कार आणि क्रीडा यांचेही महत्त्व लक्षात घेण्याचे त्यांनी आवाहन केले.

गुलमोहर रोडवरील आश्रमात

# श्री संत आसाराम बापूंचा ९०वा अवतरण दिन उत्साहात साजरा



**दैनिक आकर्षण | प्रतिनिधी**

**अहिल्यानगर–** गुलमोहर रोड येथील श्री. संत. आसाराम बापू आश्रमात परमपूज्य आसारामजी बापू यांच्या ९०व्या अवतरण दिनानिमित्त विविध धार्मिक कार्यक्रम मोठ्या उत्साहात पार पडले. गेल्या पन्नास वर्षांपासून बापूजी हिंदू व सनातन संस्कृतीचा प्रसार देश-विदेशात करत असून त्यांच्या मार्गदर्शनाखाली जगभरात सुमारे ४५० आश्रम आणि २००० योग वेदांत केंद्र कार्यरत आहेत.

या अवतरण दिनानिमित्त आश्रमात विविध सोहळ्यांचे आयोजन करण्यात आले होते. संध्याकाळी बापूजींची भव्य मिरवणूक काढण्यात आली. दुसऱ्या दिवशी सकाळी पादुका पूजन, होम-हवन यांसह धार्मिक विधी पार पडले. तसेच बापूंच्या जन्मोत्सवानिमित्त पारंपरिक पाळणा गाऊन पाळणा हलविण्यात आला. यावेळी ९० दिवे प्रज्वलित करून ५६ भोगांचा नैवेद्य अर्पण करण्यात आला व भजन-कीर्तनाच्या वातावरणात वाढदिवस साजरा करण्यात आला.

या कार्यक्रमाला सर्व साधक परिवार तसेच पंचक्रोशीतील वारकरी, भाविक व भक्त मोठ्या संख्येने उपस्थित होते. जय रंगलानी, शिंदे ताई, भगवान गवळी, शिवाजी शेळके, गोकुळ धाडगे, सुरेखाताई सांगळे, सुरज रवे आदींसह अनेक मान्यवर व भक्तगण उपस्थित होते.

कार्यक्रमाच्या शेवटी महाप्रसादाचे वाटप करण्यात आले तसेच बापूजींच्या 'ऋषी प्रसाद' अंकाचे वितरण करण्यात आले.

# जिल्ह्याच्या रेल्वे सुविधांसाठी सातत्याने प्रयत्नशील राहणार – सुदर्शन डुंगरवाल

**अहिल्यानगर रेल्वे प्रश्नांवर दिल्लीत उच्चस्तरीय बैठक; विविध महत्त्वाच्या मागण्यांना सकारात्मक प्रतिसाद**



**दैनिक आकर्षण | प्रतिनिधी**

**अहिल्यानगर–** अहिल्यानगर जिल्ह्यातील रेल्वे सुविधांशी संबंधित प्रलंबित प्रश्नांवर तोडगा काढण्यासाठी नवी दिल्ली येथे रेल्वे मंत्रालयात उच्चस्तरीय बैठक पार पडली. देशाचे रेल्वे मंत्री अश्विनी वैष्णव व राज्य मंत्री रवनीत सिंह बिट्टू यांची भेट घेऊन विविध मागण्यांचे सविस्तर निवेदन सादर करण्यात आले. या बैठकीत अहमदनगरसह राज्यातील इतर भागांतील रेल्वे विकास, प्रवासी सुविधा आणि नवीन मार्गांबाबत सखोल चर्चा झाली.

या वेळी रेल्वे बोर्डाचे डायरेक्टर पॅसेंजर मार्केटिंग-संजय मनोचा यांच्यासोबतही संवाद साधण्यात आला. मांडण्यात आलेल्या विविध प्रस्तावांवर सकारात्मक चर्चा होऊन संबंधित अधिकाऱ्यांनी याबाबत विचार करण्याचे आश्वासन दिले. या सर्व विषयांचा ठोस पाठपुरावा सुदर्शन दिलीपचंद डुंगरवाल (सदस्य केंद्रीय मध्य रेल्वे सल्लागार समिती, मुंबई) यांनी पुढाकार घेऊन केला. केंद्र स्तरावर अहमदनगर जिल्ह्याच्या प्रश्नांना प्राधान्याने मांडण्यात त्यांची भूमिका विशेष ठळक ठरली.

दरम्यान, अहिल्यानगर जिल्ह्याचे पालकमंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांनीही या विषयात सक्रिय भूमिका बजावत रेल्वे मंत्री अश्विनी वैष्णव यांच्याकडे स्वतंत्र निवेदन सादर केले. तसेच भाजपा शहर जिल्हाध्यक्ष अनिल मोहित यांनीही लेखी निवेदन देत मागण्यांना पाठिंबा दर्शवला, ज्यामुळे प्रस्तावांना अधिक बळकटी मिळाली.

बैठकीत पुढील महत्त्वाच्या मागण्या प्राधान्याने मांडण्यात आल्या

अहिल्यानगरपुणे इंटरसिटी रेल्वे सुरू करणे, जेणेकरून दररोज प्रवास करणाऱ्या प्रवाशांना मोठा दिलासा मिळेल. साईनगर शिर्डीदादर (११०४१/११०४२) रेल्वे दररोज धावती करणे, ज्यामुळे भाविक व प्रवाशांची सोय होईल.अहमदनगरराजस्थान (अजमेरजयपूर) दरम्यान नवीन रेल्वे सेवा सुरू करणे, ज्यामुळे दोन राज्यांतील संपर्क अधिक मजबूत होईल.अकोलाबालापूर येथून पलितानाभावनगर (गुजरात) साप्ताहिक रेल्वे सेवा सुरू करणे, ज्यामुळे व्यापार व धार्मिक पर्यटनाला चालना मिळेल.याशिवाय, इतरही अनेक जनहिताच्या व प्रवासी सुविधांशी संबंधित मागण्या निवेदनाद्वारे मांडण्यात आल्या. सूत्रांच्या माहितीनुसार, रेल्वे मंत्रालयाने या प्रमुख मागण्यांबाबत सकारात्मक भूमिका दर्शवली असून लवकरच काही निर्णय अपेक्षित आहेत.
या प्रसंगी केंद्र सरकारकडून रेल्वे सेवांच्या विस्तार व आधुनिकीकरणासाठी सुरू असलेल्या उपक्रमांचे कौतुक करण्यात आले. या उपक्रमांमुळे सर्वसामान्य नागरिकांना मोठ्या प्रमाणात लाभ होत असल्याचे नमूद करण्यात आले. याबाबत सुदर्शन डुंगरवाल म्हणाले, अहमदनगर जिल्ह्याच्या रेल्वे सुविधांमध्ये वाढ करणे ही काळाची गरज आहे. प्रवासी, व्यापारी आणि भाविकांच्या सोयीसाठी आम्ही सातत्याने प्रयत्नशील राहणार आहोत.

या बैठकीमुळे अहमदनगर जिल्ह्याच्या रेल्वे विकासाला नवी गती मिळण्याची अपेक्षा व्यक्त होत आहे.

# लेखनातून समाज घडतो; नवोदित व महिला लेखकांनी पुढे यावे - मंत्री उदय सामंत

**'अनुबंध' रहस्यमय कादंबरीचे मराठी भाषा मंत्री उदय सामंत यांच्या हस्ते प्रकाशन**



**दैनिक आकर्षण | प्रतिनिधी**

**अहिल्यानगर–** कामिनी एक गुढ रहस्य या रहस्यमय कादंबरीच्या यशानंतर लेखिका प्रा. सौ. वसुधा ज्ञानेश देशपांडे लिखित आणि बल्लाळ प्रकाशन, नाशिक प्रकाशित अनुबंध रहस्यमय शोध या रहस्यमय कादंबरीचे प्रकाशन महाराष्ट्र राज्याचे उद्योगमंत्री तथा मराठी भाषा मंत्री उदयजी सामंत आणि प्रा. डॉ. प्रदीप ढवळ उपाध्यक्ष महाराष्ट्र राज्य साहित्य आणि सांस्कृतिक मंडळ, मुंबई यांच्या शुभ हस्ते मंत्रालय मुंबई येथे संपन्न झाले.

यावेळी मंत्री उदयजी सामंत यांनी महाराष्ट्रात बरेच लेखक आपल्या लेखणीतून समाज घडवण्याचे काम करत असतात असे सांगितले. आजकालच्या तरुण पिढीला रहस्यमय कथांची जी आवड निर्माण झाली आहे त्याला अनुसरून सौ. वसुधा देशपांडे यांनी आपली दुसरी कादंबरी वाचकांसाठी उपलब्ध केली, त्याबद्दल त्यांनी प्रा. देशपांडे यांचे अभिनंदन केले. नवोदित लेखकांनी मराठी साहित्य निर्मितीकडे आपला कल वाढवला पाहिजे हे सांगतानाच महिलांनीसुद्धा निरनिराळ्या विषयावर कादंबरी लेखन करावे असे आवाहन त्यांनी केले.

याबाबत आपले विचार मांडताना प्रा. डॉ. ढवळ म्हणाले की लिखाणाचा दर्जा उत्तम असेल तर ते लेखन किंवा ते पुस्तक वाचकांच्या पसंतीस नक्कीच उतरते. प्रा. देशपांडे यांच्या पहिल्याच कादंबरीस वाचकांची भरघोस दाद मिळाली. यामुळेच त्यांना पुरस्कार प्राप्त झाले. अनुबंध रहस्यमय शोध ही दुसरी रहस्यमय कादंबरी सुद्धा वाचकांच्या पसंतीस उतरो तसेच नवनवीन विषयावर आपले लेखन होवो अशा शब्दात त्यांनी शुभेच्छा दिल्या.

सौ. वसुधा देशपांडे यांनी आपल्या प्रास्ताविकात सांगितले की, कामिनी गूढ रहस्य या कादंबरीला वाचकांनी भरघोस प्रतिसाद दिला आणि तिला सहा पारितोषिके मिळाली. हीच प्रेरणा घेऊन अनुबंध रहस्यमय शोध या कादंबरीची निर्मिती झाली. कामिनीतील नायिका संजना वर जसे रसिक वाचकांनी मनापासून प्रेम केले तशीच अनुबंध मधील आरतीही वाचकांच्या मनाला नक्की भावेल असा त्यांचा विश्वास आहे. कादंबरी प्रकाशानासाठी मंत्री उदय सामंत आणि प्रा. डॉ. प्रदीप ढवळ यांनी वेळ दिला त्याबद्दल त्यांचे आभार मानले.

या प्रकाशन सोहळ्यासाठी बल्लाळ प्रकाशनचे श्री दिलीप बल्लाळ, श्री शार्दुल बल्लाळ, श्री ज्ञानेश देशपांडे, श्री विकेश मानकर यांनी विशेष परिश्रम घेतले.

# पटपडताळणी मोहिमेच्या तारखा पुढे ढकलाव्यात

**शिक्षक भारतीची शिक्षणाधिकाऱ्यांकडे मागणी | शिक्षकांवर दुहेरी ताण टाळण्यासाठी पटपडताळणी पुढे ढकलावी– गाडगे**

**दैनिक आकर्षण | प्रतिनिधी**

**अहिल्यानगर–** राज्यातील शाळांची पटपडताळणी मोहीम पॅट परीक्षांच्या कालावधीतच आयोजित करण्यात आल्याने शाळांवर अनावश्यक ताण निर्माण होत असल्याचा मुद्दा उपस्थित करत शिक्षक भारती संघटनेच्या वतीने मा. शिक्षणाधिकारी (माध्यमिक), अहिल्यानगर यांना आज निवेदन देण्यात आले. सदर मोहिमेच्या तारखा पुढे ढकलण्याची मागणी यावेळी करण्यात आली.

राज्यातील शाळांची पटपडताळणी दिनांक ११, १५ व २२ एप्रिल रोजी आयोजित करण्यात आली आहे. त्याच कालावधीत पॅट परीक्षा सुरू असून, इयत्ता ९ वी व इयत्ता ११ वीच्या विशिष्ट विषयांच्या परीक्षांचे आयोजनही करण्यात आले आहे. या सर्व परीक्षा आणि प्रशासकीय कामांचा ताण एकाच वेळी येत असल्यामुळे शिक्षक व शाळा प्रशासन अडचणीत येत असल्याचे निवेदनात नमूद करण्यात आले आहे.
शिक्षक भारतीचे राज्य सचिव तथा शिक्षक नेते सुनील गाडगे यांच्या नेतृत्वाखालील शिष्टमंडळाने हे निवेदन सादर केले.



यावेळी जिल्हाध्यक्ष तथा माध्यमिक शिक्षक सोसायटीचे संचालक आप्पासाहेब जगताप, जिल्हा सचिव विजय कराळे, नवनाथ घोरपडे विजय लंके, आनंद झरेकर, संजय पवार, कैलास जाधव, संभाजी पवार, हनुमंत रायकर, सिकंदर शेख, संतोष देशमुख, किसन सोनवने, संतोष शेंदुरकर, संभाजी चौधरी, श्रीकांत गाडगे, अशा मगर विभावरी रोकडे, मीनाक्षी सूर्यवंशी, रोहिणी भोर, शकुंतला वाळुज, छाया लष्करे, जया गागरे, अनघा सासवडकर, रूपाली बोरुडे, सोनाली अकोलकर आदींनी पाठिंबा दिला आहे .

निवेदनात असे स्पष्ट करण्यात आले की, सध्याच्या परिस्थितीत शाळांकडे मनुष्यबळ मर्यादित असून, एकाच वेळी परीक्षा व पटपडताळणीची जबाबदारी पार पाडणे अत्यंत कठीण आहे. त्यामुळे विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक गुणवत्तेवर परिणाम होण्याची शक्यता नाकारता येत नाही. परिणामी, शिक्षण विभागाने परिस्थितीचा विचार करून पटपडताळणी मोहिमेच्या तारखा पुढे ढकलाव्यात, अशी मागणी करण्यात आली आहे.

# शिवसेना ही जनतेच्या प्रश्नांसाठी लढणारी चळवळ; संघटन बळकट करा– रामजी रेपाळे

**शिवसेनेचे जिल्हा संपर्कप्रमुख रामजी रेपाळे यांच्या उपस्थितीत शिवसेना पदाधिकारी यांची बैठक**

**दैनिक आकर्षण | प्रतिनिधी**

**अहिल्यानगर–** अहिल्यानगर येथे शिवसेनेचे जिल्हा संपर्कप्रमुख रामजी रेपाळे यांच्या आगमनानिमित्त शहरात शिवसैनिकांनी उत्साहपूर्ण स्वागत केले. या प्रसंगी पक्षाच्या पदाधिकाऱ्यांनी व कार्यकर्त्यांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहून पक्षनिष्ठेचा परिचय दिला. शहरातील प्रमुख ठिकाणी झालेल्या या स्वागत समारंभामुळे शिवसेनेचे संघटनात्मक बळ अधोरेखित झाले.

अहिल्यानगर येथे शिवसेनेचे जिल्हा संपर्कप्रमुख रामजी रेपाळे यांच्या उपस्थितीत शिवसेना पदाधिकारी यांची बेठक आयोजित केली होती यावेळी जिल्हाप्रमुख अनिल शिंदे, शहरप्रमुख संभाजी कदम, दिलीप सातपुते, सचिन जाधव, बाळासाहेब बोराटे, गणेश कवडे, संजय शेंडगे, दत्ता जाधव, श्याम आप्पा नळकांडे, नवनाथ कातोरे यांच्यासह महिला जिल्हाप्रमुख ॲड. स्वाती जाधव, माजी महापौर सुरेखा कदम, सुवर्णा जाधव, मंगल लोखंडे ,सुरेश तिवारी ,संदीप दातरंगे, सचिन शिंदे, रणजित परदेशी, विकी लोखंडे, आनंदराव शेळके, चेतन शिरसुल, ओंकार फुलसुंदर, काका शेळके, ओंकार सातपुते आदी पदाधिकारी उपस्थित होते.



अहिल्यानगरच्या शिवसेनेचे जिल्हा संपर्कप्रमुख रामजी रेपाळे यांची निवड झाल्याबद्दल ते प्रथमच येथे आले होते यावेळी शिवसेनेच्या वतीने त्यांचे स्वागत करण्यात आले

यावेळी रामजी रेपाळे यांनी आपल्या भाषणात शिवसेनेच्या कार्यपद्धतीचा आढावा घेत कार्यकर्त्यांना प्रेरित केले. ''शिवसेना ही केवळ राजकीय पक्ष नसून ती सामान्य जनतेच्या प्रश्नांवर लढणारी चळवळ आहे. प्रत्येक शिवसैनिकाने जनतेच्या अडचणींना प्राधान्य देत काम केले पाहिजे,'' असे ते म्हणाले. त्यांनी पक्षाच्या धोरणांवर ठाम राहून संघटन मजबूत करण्याचे आवाहन केले.

पुढे बोलताना रेपाळे म्हणाले, ''आगामी काळात स्थानिक पातळीवर शिवसेनेचे अस्तित्व अधिक बळकट करण्यासाठी युवकांना संधी दिली जाणार आहे. समाजातील प्रत्येक घटकापर्यंत पोहोचून त्यांच्या प्रश्नांची सोडवणूक करणे हीच खरी शिवसेनेची ओळख आहे.'' त्यांनी कार्यकर्त्यांना एकजुटीने काम करण्याचे आवाहन करत आगामी निवडणुकांसाठी सज्ज राहण्याचा संदेश दिला.

जिल्हाप्रमुख अनिल शिंदे यांनी सांगितले की, ''रामजी रेपाळे यांचे मार्गदर्शन जिल्ह्यातील शिवसैनिकांसाठी प्रेरणादायी ठरणार आहे. त्यांच्या नेतृत्वाखाली जिल्ह्यातील संघटन अधिक मजबूत होईल आणि पक्षाची ताकद वाढेल.'' त्यांनी सर्व पदाधिकाऱ्यांनी समन्वयाने काम करण्याची गरज व्यक्त केली.

# जगदंब फाऊंडेशनची आदर्श एकल महिलांना पुरस्कार ही उत्कृष्ट संकल्पना – महापौर ज्योती गाडे

**अहिल्यानगर महानगरपालिका, जगदंब फाउंडेशन व साऊ एकल महिला समितीच्या महामेळाव्यात विविध उपक्रम**

**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**



**अहिल्यानगर–** अनेक संकटावर मात करून ज्या एकल महिलांनी व्यवसाय सुरू करून स्वतःचे कुटुंब सावरले व प्रगती केली अशा एकल महिला शोधून त्यांना पुरस्कार देण्याची ही जगदंब फाउंडेशनची संकल्पना खूप उत्कृष्ट आहे, असे उद्गार महापौर ज्योती गाडे यांनी एकल महिलांच्या मेळावा प्रसंगी काढले.

अहिल्यानगर महानगरपालिका, जगदंब फाउंडेशन व साऊ एकल महिला समिती यांच्या संयुक्त विद्यमाने महानगरपालिकेच्या राजमाता जिजाऊ सभागृहामध्ये नुकताच एकल महिलाचा भव्य असा रोजगार मेळावा पार पडला. यामध्ये कडधान्य वाटप, बॅग वाटप, एकल महिलांना पुरस्कार वितरण, पैठणी सह भव्य लकी ड्रॉ, रोजगार उद्योग विषयाबाबत चर्चासत्र व विविध शासकीय योजनांची माहिती असे विषय होते. महानगरपालिकेच्या महिला बालकल्याण सभापती दिपाली बारस्कर यांनी एकल महिलांसाठी महानगरपालिकेमार्फत चांगले मोठे प्रकल्प नक्कीच राबविले जातील असे आश्वासन फाउंडेशनला दिले. कार्यक्रमापुर्वी उपमहापौर धनंजय जाधव व आयुक्त यशवंत डांगे, उपायुक्त श्री लहारे यांनी एकल महिलांच्या सर्व प्रश्नांसाठी आम्ही पुढाकार घेवू असे आश्वासन दिले.

या महामेळाव्याचे चोख असे नियोजन फाउंडेशनचे अध्यक्ष गणेश लंघे, कार्याध्यक्षा जयश्री कुटे, साऊ समितीचे जिल्हाध्यक्ष व फाउंडेशनचे सचिव अशोक कुटे, आप्पासाहेब बेलदार, प्रकाश इथापे, दत्तात्रय उरमुडे, भाऊसाहेब नगरे,कविता अभंग,अश्विनी झरेकर, सुजाता गोरे, अश्विनी जाधव सावित्रा प्रशांत गायकवाड यांनी केले होते. मेळाव्यासाठी एकूण १४ नगरसेविका व ११३ एकल महिला उपस्थित होत्या. माजी उपमहापौर गीतांजली काळे व माजी महिला बालकल्याण सभापती, विद्यमान नगरसेविका पुष्पाताई बोरुडे यांनी एकल महिलांचा असा मेळावा प्रथमतःच नगर महानगरपालिकेमध्ये घडत आहे असे म्हणून फाउंडेशनच्या उत्कृष्ट नियोजनाबद्दल त्यांचे कौतुक केले. सर्वांनी एकल महिलांचा सन्मान करावा असे त्यांनी आवाहन केले.

यावेळी अमृता जाधव व रेवती धापटकर यांनी एकल महिलांसाठी दिग्विजय पार्किंगमध्ये रोजगार बद्दल माहिती दिली. रोजगार उद्योग विषयावर चर्चासत्र झाले. मेळाव्यातील वेगळा महत्त्वाचा घटकामध्ये जानकी निमसे, शिशेलिया मनेल, सविता पेहेरे, वैशाली गोंधळे, प्रमिला पाटकर, भाग्यश्री दराडे या आदर्श एकल महिलांना पुरस्कार देऊन सन्मानित करण्यात आले. जिमबा कार्यालयातील रुपाली वाव्हळ, श्रद्धा अंधारे, मीना विटूरे या आदर्श महिला कर्मचाऱ्यांना एकल महिलांच्या कार्याबद्दल पुरस्काराने सन्मानित करण्यात आले. शिशेलिया मनेल, सविता खोमणे व मोनिका औटी या एकल महिलांनी संस्थेच्या कार्याबाबत आपल्या भावना व्यक्त केल्या.

या मेळाव्यासाठी महिला बालकल्याण उपसभापती वर्षा सानप, सर्व नगरसेविका– रोशनी त्र्यंबके, अनिता शेटिया, सुजाता पडोळे, पौर्णिमा गव्हाळे, वर्षा काकडे, सुनीता कांबळे, मयुरी जाधव , कमल कोतकर, तालुका कृषी अधिकारी क्रांती चौधरी, उपजिल्हा महिला बालकल्याण अधिकारी संजय सांगळे, शहर बाल विकास प्रकल्पाधिकारी महादेव जायभाय, जिल्हा बाल संरक्षण अधिकारी प्रशांत गायकवाड इत्यादी मान्यवरांची प्रमुख उपस्थिती होती. भाऊसाहेब नगरे यांनी उत्कृष्ट सूत्रसंचालन केले.

समितीचे अशोक कुटे यांनी मला अडीच वर्षांपूर्वी शिलाई मशीन दिल्यानंतर त्या शिलाई मशीन वर मी बरेच काम करून माझे कुटुंब चालवत आहे. आदर्श पुरस्कार प्राप्त महिला शिशेलिया मनेल यांची प्रतिक्रिया.

# शासकीय तांत्रिक प्रशालेतील १९७२ च्या बॅचचे स्नेहसंमेलन

**तब्बल ५४ वर्षांनंतर विद्यार्थ्यांच्या प्रशालेत गाठीभेटी !**

**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**



**अहिल्यानगर–** येथील नगर कॉलेज जवळील शासकीय तांत्रिक प्रशालेतील १९७२ च्या बॅचचे स्नेहसंमेलन अत्यंत उत्साहपूर्ण वातावरणात संपन्न झाले. तब्बल ५४ वर्षांनंतर प्रशालेत गाठीभेटी झाल्याने विद्यार्थी गहिवरले. प्रशालेच्या इतिहासात प्रथमच झालेल्या या स्नेहसंमेलनाने विद्यमान शिक्षक तर भारावूनच गेले!

आपल्या प्रशालेतील वर्गमित्रांचे स्नेह संमेलन व्हावे, अशी पांडुरंग देवकुळे यांची तीव्र इच्छा असल्याने वर्गमित्र प्रभाकर मुळे, सुभाष पाठक, रणजित पोखरणा आणि राजेंद्रप्रसाद सिकची या वर्गमित्रांनी पुढाकार घेतला. बॅचमधील विद्यार्थ्यांची शोधाशोध करीत संपर्क साधण्यात आले. ५४ वर्षांनंतर गाठीभेटी होणार या आनंदात स्नेहसंमेलनाचा सुमुहूर्त काढण्यात आला. विद्यमान प्राचार्य सुनिल शिंदे यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या स्नेहसंमेलनास एम.बी.सावंत, एल.एन. सादुल आणि श्रीमती जी.एन.हरिश्चंद्रे हे विद्यमान शिक्षक मोठ्या उत्सुकतेने उपस्थित होते.

सरस्वती पूजन आणि दीपप्रज्वलन करून सामुहिक वंदेमातरम् ने संमेलनाची सुरुवात करण्यात आली. दिवंगत मित्रांना श्रध्दांजली अर्पण करण्यात आली.मोहन गांधी यांनी प्रास्ताविक केले.

इंजि.नंदकुमार दत्तात्रय उर्फ एन.डी. कुलकर्णी यांनी उत्तम नियोजन करत सूत्रसंचालनाची जबाबदारी पार पाडली. ते म्हणाले, ज्ञानेश्वर माऊलींनी आज सोनियाचा दिनु वर्षे अमृताचा घनु... असे म्हटले तो आनंद आम्हा सर्वांना झाला व आमच्यावर अमृताचा वर्षाव झाला असे वाटते. तब्बल ५४ वर्षांनंतर स्नेहसंमेलनानिमित्त आम्ही सर्व एकत्र आलो. आजही मैत्रीतील स्नेहबंध अतुट आहेत, हे या स्नेहसंमेलनाने दाखवून दिले. टेक्निकल हायस्कूल मध्ये मिळालेल्या ज्ञानाचा आम्हाला आयुष्यात खुपच उपयोग झाला.

अध्यक्षस्थानावरून बोलताना प्राचार्य सुनिल शिंदे म्हणाले, माजी विद्यार्थ्यांची स्नेहसंमेलन आयोजित करावीत, असे शासनाचे आदेश आहेत. १९७२ च्या बॅचमधील विद्यार्थ्यांनी या स्नेहसंमेलनाचे आयोजन केले. प्रशालेच्या इतिहासात हे पहिलेच स्नेहसंमेलन होत आहे. ५४ वर्षांनंतर आपण सर्वजण आपली प्रशाला म्हणून आपलेपणाने आलात. आनंद वाटला, असे सांगितले. आपली भेट येथून पुढे नेहमीच व्हावी जेणेकरून आपल्या ज्ञानाचा व अनुभवाचा आम्हाला लाभ मिळु शकेल.

मोहन गांधी ,रत्नाकर कुलकर्णी आणि सुभाष पाठक यांनी मनोगत व्यक्त केले. आभारप्रदर्शन सुभाष पाठक यांनी केले. राष्ट्र गीताने संमेलनाचा समारोप करण्यात आला. संमेलनास सर्वश्री पांडुरंग देवकुळे, प्रभाकर मुळे, इंजि. नंदकुमार कुलकर्णी, रणजित पोखरणा, अशोक गांधी, प्रा.रत्नाकर कुलकर्णी, अनिल लचके, इंजि.श्रीकृष्ण होशिंग (तिघेही पुणे), इंजि. मोहन गांधी, राजेंद्रप्रसाद सिकची, ईजि सुभाष पाठक प्रभुती उपस्थित होते.

१९७२ च्या बॅचचे शिक्षक कै.देवस्थळी, उपासनी, शिरसाठ आणि लोणकर यांच्या आठवणींना उजाळा दिला गेला. सिकची यांच्यामुळे मिळालेल्या बुरूडगाव रोडवरील आनंद ज्येष्ठ नागरिक संघाच्या सभागृहात बसून प्रशालेसह शहरातील तत्कालीन आनंददायी आठवणींना उजाळा देत साश्रुनयनांनी सर्वांनी निरोप घेतला.

संमेलनाचे सुरेख नियोजन, लक्षवेधी सूत्रसंचालन आणि उत्कृष्ट आयोजन याबद्दल विद्यमान प्राचार्यासह शिक्षकांनी समाधान व्यक्त केले.

# श्री मार्कंडेय पद्मशाली उपवधू वर सूचक बहुउद्देशीय संस्थेच्या वतीने मोफत आरोग्य शिबिराचे आयोजन

**मोफत औषध वाटप ही होणार – नागरिकांनी मोठ्या संख्येने याचा लाभ घ्यावा आयोजकांचे आवाहन**

**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**अहिल्यानगर–** समाजसेवेच्या उद्देशाने ''एक पाऊल, मानव सेवेसाठी'' या संकल्पनेतून श्री मार्कंडेय पद्मशाली उपवधू-वर सूचक बहुउद्देशीय संस्थेच्या वतीने भव्य मोफत आरोग्य शिबिर व मोफत औषध वाटपाचे आयोजन करण्यात आले आहे.

हे आरोग्य शिबिर रविवार, दि. १२ एप्रिल २०२६ रोजी सकाळी १० ते दुपारी ३ वाजेपर्यंत श्री मार्कंडेय संकुल, दातरंगे मळा, अहिल्यानगर येथे आयोजित करण्यात आले आहे.

या शिबिरात डॉ. सुरेंद्र रच्चा, डॉ. लक्ष्मण वन्नम, डॉ. प्रशांत सुरकुटला, डॉ. शाम गुरुड, डॉ. साईनाथ चिंता, डॉ. योगेश मंचे, डॉ. कुणाल रच्चा, डॉ. भावना पेंडम, डॉ. रत्ना बल्लाळ (स्त्रीरोग तज्ज्ञ), डॉ. कंचन रच्चा (स्त्रीरोग तज्ज्ञ), डॉ. सुरेखा वन्नम, डॉ. प्रिती सुरकुटला, डॉ. अक्षता बडगु, डॉ. भाग्यश्री पेंडम तसेच नेत्रतज्ज्ञ डॉ. रावसाहेब बोरुडे आदी विविध तज्ज्ञ डॉक्टर सहभागी होणार असून नागरिकांना विविध आजारांवर मोफत तपासणी व मार्गदर्शन मिळणार आहे.

या शिबिरामध्ये सर्वसाधारण आरोग्य तपासणी, बालरोग, स्त्रीरोग, दंत तपासणी, नेत्र तपासणी, होमिओपॅथी व आयुर्वेद सल्ला तसेच रक्तदाब, रक्तातील साखर, रक्तगट, थायरॉईड इत्यादी प्राथमिक तपासण्या ही करण्यात येणार आहेत. आवश्यक त्या रुग्णांना मोफत औषधांचेही वाटप यावेळी करण्यात येणार आहे.

या उपक्रमाचे आयोजन श्री मार्कंडेय पद्मशाली उपवधू-वर सूचक बहुउद्देशीय संस्था यांनी केले असून, विविध मान्यवर व सामाजिक कार्यकर्त्यांचे सहकार्य लाभले आहे. विशेष सहकार्य म्हणून श्री. प्रणित अनमल तसेच महेश मंगलारप, अरविंद पंतम, आशिष कुर्रे, रितेश आडेप, किरण गरुड, जगदीश रामदीन, दिनेश गुंडू, सौरभ तिरमल, अभिषेक बुरा, महेंद्र आडेप, सिद्धराम श्रीकांत, नरसिंह येमल, नरेंद्र मेरुगु यांचेही सहकार्य लाभत आहे. तसेच विविध क्षेत्रातील सहकाऱ्यांनी पुढाकार घेतला आहे.

या मोफत आरोग्य शिबिराचा जास्तीत जास्त नागरिकांनी लाभ घ्यावा, आपल्या कुटुंबीयांची आरोग्य तपासणी करून घ्यावी व आरोग्याबाबत जागरूक राहावे, असे आवाहन आयोजकांनी केले आहे. अधिक माहितीसाठी दत्तात्रय जोग ९२७०० २५००३, शिवाजी संदूपटला ९४०५६ ९९५४२, शंकर नक्का ९८६०८ ४७१८४. यांच्याशी संपर्क करावा. नागरिकांनी या संधीचा लाभ घेऊन निरोगी जीवनाकडे एक पाऊल टाकावे, असे आवाहन करण्यात आले आहे.



सर्व जगात शांती, सकारत्मक ता,व विश्व कल्याण हावे यासाठी ९ एप्रिल हा दिवस सर्व जगात'' विश्व नवकार महामंत्र '' दिवस म्हणुन साजरा केला जातो. आज येथील धार्मिक परिक्षा बोर्डात हा दिवस हजारो भाविकांच्या उपस्थितीत न वकार मंत्राचा जाप करून उत्साहात साजरा करण्यात आला. याप्रसंगी जैन धर्मियांचे धर्मगुरू महाराष्ट्र प्रवर्तक प. पु. कुंदनरुषिजी म.सा. प्रबुध्द विचारक प.पु. आदर्शरुषीजीम.सा. व प.पु.आलोकरूषीजी म.सा. तसेच ऑन लाईन वर केंद्रिय गृहमंत्री नाम अमित शाह यांनी उपस्थिती दर्शवत भाविकांना नवकार महामंत्राचे महत्व विषद केले. (छाया – अनिल शाह )

# महान योगी निराहारी संत दादा गुरु महाराज यांचे उद्या प्रथमच शहरात आगमन

**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**अहिल्यानगर–** प.पू.महान योगी निराहारी संत श्री दादा गुरु महाराज यांचे शुक्रवारी दि.१० एप्रिल २०२६ ला सकाळी ११ वाजता नगर शहरातील आई तुळजाभवानी कॉलनी, सारसनगर येथे प्रथमच आगमन होत आहे, अशी माहिती श्री.गौरव हरबा आणि श्री.रूपेश हरबा यांनी दिली.



ते म्हणाले, नर्मदेची पायी परिक्रमा करून दिव्य अनुभूती घेतलेले साहित्यिक -पत्रकार मिलिंद चवंडके आणि विनायक लांडे यांच्यामुळे प्रभावित होऊन आमचे पिताश्री भगवान हरबा यांनी नर्मदा परिक्रमा करण्याचा निर्णय घेतला. नर्मदा परिक्रमा करताना निराहारी संत दादा गुरु महाराजांच्या सोबत चालण्याचे भाग्य मिलिंद चवंडके आणि विनायक लांडे यांना लाभले होते. त्यामुळे त्यांनी दादा गुरु महाराजांच्या परिक्रमेत जाण्याचा सल्ला देऊन त्यांच्या व्यवस्थापनाशी भगवान हरबा यांना संपर्क साधून दिला.

दादा गुरु महाराजांच्या दिव्य सान्निध्यात परिक्रमा पूर्ण करण्याचा आनंद घेताना नगरला येण्याची विनंती भगवान हरबा यांनी केली. ती मान्य केल्याने दादा गुरु महाराज नगरला प्रथमच येण्याचे निश्चित झाले.

त्यांच्या दर्शनाचा आणि सत्संगाचा महासोहळा हिंदू धर्म रक्षक आ.संग्रामभैय्या जगताप यांच्या प्रमुख उपस्थितीत आयोजित करण्यात आला आहे. शहरातील नर्मदा भक्तांनी या सोहळ्याचा लाभ घ्यावा, असे आवाहन भगवान हरबा यांनी केले आहे.

**राज्यस्तरीय वाचन संस्कृती ग्रंथ पुरस्कार**


# कथालेखक बाळासाहेब देशमुख यांच्या रंग माझा वेगळा कथासंग्रहास जाहीर

**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**अहिल्यानगर–** वाचन संस्कृती प्रतिष्ठान श्रीरामपूर या संस्थेचे राज्यस्तरीय वाचन संस्कृती ग्रंथ पुरस्कार जाहीर करण्यात आलेले असून.. अहिल्यानगर येथील कथालेखक श्री बाळासाहेब देशमुख यांच्या रंग माझा वेगळा.. या कथासंग्रहास राज्यस्तरीय वाचन संस्कृती ग्रंथ पुरस्कार २०२६ जाहीर झाल्याचे पत्र बाळासाहेब देशमुख यांना प्रतिष्ठानकडून मिळाले.

सदर पत्र प्रतिष्ठानचे संस्थापक अध्यक्ष, संयोजक जेष्ठ साहित्यिक डॉ.बाबुराव उपाध्ये, उपाध्यक्षा संगीता फासाटे कटारे, पुरस्कार समिती अध्यक्ष प्रा.डॉ. शिवाजी काळे, कार्याध्यक्ष गणेशानंद उपाध्ये, कोषाध्यक्ष सौ मंदाकिनी उपाध्ये या






मान्यवरांनी कळविलेले आहे.

बाळासाहेब देशमुख यांच्या रंग माझा वेगळा या कथासंग्रहास या अगोदर ,अखिल भारतीय साहित्य परिषद पुणे या संस्थेचा.. महात्मा फुले राज्यस्तरीय सर्वोत्कृष्ट ग्रंथ म्हणून पुरस्कार मिळालेला आहे..

हा कथासंग्रह सकाळ प्रकाशन पुणे यांनी काढलेला असून, त्यास सुप्रसिद्ध साहित्यिक सदानंद भणगे व श्रीराम जोशी संपादक दैनिक नगर टाइम्स या मान्यवरांची प्रस्तावना लाभलेली आहे. या पुस्तकाचे प्रकाशन प्रा.मिलिंद जोशी अखिल भारतीय साहित्य महामंडळ अध्यक्ष यांच्या शुभहस्ते झाले होते.

सदर पुरस्काराचे वितरण १५ एप्रिल २०२६ रोजी, श्री संत गोरोबाकाका पुण्यतिथी दिनी श्रीरामपूर येथे होणार आहे .अशी माहिती कोषाध्यक्ष सौ मंदाकिनी उपाध्ये यांनी कळविलेले आहे.

या पुरस्काराबद्दल बाळासाहेब देशमुख यांचे साहित्यिक, साहित्य प्रेमी वाचकांकडून अभिनंदन होत आहे.

## कडाक्याच्या उन्हात पक्षांसाठी पिण्याच्या पाण्याची व्यवस्था करून जीवदयेत सहभागी व्हावे

**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**अहिल्यानगर–**एप्रिलमध्ये कडाक्याच्या उन्हाचा ताप वाढला आहे. उन्हातान्हात फिरताना थंडगार पाणी पिऊन प्रत्येक जण उन्हाची काहिली कमी करण्याचा प्रयत्न करत असतो. मनुष्याला पाणी सहज उपलब्ध होत असले तरी पाण्याचे नैसर्गिक स्त्रोत आटल्याने पक्षांचे हाल होतात. विशेषतः शहरी भागात पक्षांना पाण्याचे खूप दुर्भिक्ष जाणवते. पक्षांनाही तहान लागते. अशा वेळी या मुक्या जीवांना प्रत्येक जण एक कृती करून जगण्याचा आधार देऊ शकतो. प्रत्येकानं आपल्या घराच्या मोकळ्या जागेत, गच्चीवर पाण्याचे भांडे ठेवल्यास जीवदयेचे मोठे कार्य होऊ शकते



यासाठी नगरमधील गांधी कुरियरने पुढाकार घेत मोफत पाण्याचे भांडे उपलब्ध करून दिले आहे. नागरीकांनी हे भांडे घेऊन जाऊन पक्षांसाठी त्याचा उपयोग करावा असे आवाहन गांधी कुरियरचे संचालक तथा जैन ओसवाल पतसंस्थेचे संचालक संतोष गांधी यांनी केले आहे.

संतोष गांधी यांनी सांगितले की, दरवर्षी उन्हाळ्यात पाणी न मिळाल्याने अनेक पक्षांना जीव गमवावा लागतो. आपली संस्कृती प्राणीमात्रांवर दया करण्याची शिकवण देते. प्रत्येकाची सकाळ पक्षांच्या मधुर किलबिलाटाने प्रसन्न होते. त्यामुळे आपणही उन्हाची तीव्रता लक्षात घेऊन पक्षांसाठी कर्तव्य भावनेने त्यांच्यासाठी पिण्याच्या पाण्याची व्यवस्था केली पाहिजे. यासाठी सुंदर पाण्याचे भांडे मोफत उपलब्ध आहे. नागरिकांनी हे पाण्याचे भांडे घेऊन जाऊन जीवदयेस हातभार लावावा असे आवाहन गांधी यांनी केले आहे. मोफत पाण्याच्या भांड्यासाठी संपर्क – गांधी कुरियर्स, नगर अर्बन बँके शेजारी, पानसरे गल्ली, अहिल्यानगर. फोन ०२४१-२३४६८७५.

(पान १ वरून)

## देवीभोयरे फाटा, सुपा, सारोळा, खडकी रस्ता कामातील सुधारणांना मंत्रालयातून हिरवा कंदील

(रेल्वे अंडर ब्रिज) ची मागणी व गरज आमदार दाते यांनी निदर्शनास आणून दिल्यावर मंत्री महोदयांनी नवीन (रेल्वे अंडर ब्रिज) उभारण्यासंदर्भात सार्वजनिक बांधकाम अधिकारी व रेल्वे सकारात्मकता दर्शवत पुढील कार्यवाही करण्यासंदर्भातही सबंधित अधिकाऱ्यांना सूचना देण्यात आल्या.

या बैठकीत सार्वजनिक बांधकाम विभागाचे सचिव राजभोज, सचिव (रस्ते) सार्वजनिक बांधकाम विभाग बोरसे, सार्वजनिक बांधकाम प्रादेशिक विभाग नाशिकचे मुख्य अभियंता प्रशांत भोये, पुणे रेल्वेचे विभागीय व्यवस्थापक पैठणकर, सार्वजनिक बांधकाम मंडळ अहिल्यानगरचे अधीक्षक अभियंता म्हाळुंगे, सार्वजनिक बांधकाम विभाग अहिल्यानगरचे कार्यकारी अभियंता जाधव, सार्वजनिक बांधकाम उपविभाग पारनेरचे उपकार्यकारी अभियंता वसईकर तसेच चेतक एन्टरप्रायजेसचे भोसले, राजपथचे चव्हाण इ. अधिकारी उपस्थित होते. सर्व विभागांमध्ये समन्वय साधून ही कामे जलदगतीने पूर्ण करण्यावर भर देण्यात यावा अशा सूचना त्यांना यावेळी देण्यात आल्या.

आमदार काशिनाथ दाते सरांच्या सातत्यपूर्ण पाठपुराव्यामुळे आणि ठाम नेतृत्वामुळे पारनेर-नगर मतदारसंघाच्या विकासाला नवे बळ मिळत असून, यानिमित्ताने अनेक दिवसांपासून प्रलंबित असलेले व नागरिकांची प्राधान्याने मागणी असलेले हे प्रश्न मार्गी लागण्याचा मार्ग मोकळा झाला आहे. नागरिकांच्या दैनंदिन जीवनाशी निगडित असलेल्या या प्रश्नांवर मंत्रालय स्तरावर निर्णय होणे ही मोठी उपलब्धी मानली जात आहे.